Ho* Payment Successful. Your Payment Confirmation Number is 99931037

CHALLAN

MTR Form Number - 6

| GRN NUMBER | MH004225024201617R | BARCODE | Form ID : | Date: 14-09-2016 |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Department | IGR | | Payee Details | |
| Receipt Type | RE | | Dept. ID (If Any) | |
| Office Name | IGR312-NSK2_NASHIK 2 JOINT SUB REGISTRAR | Location | PAN No. (If Applicable) | PAN-AHFPV1097A |
| Year | Period: From : 14/09/2016 To : 31/03/2099 | | Full Name | ANIL PRALHAD VELE |
| Object | | Amount in Rs. | Flat/Block No, Premises/ Bldg | S NO 27B 14 PLOT NO 35 PAIKI |
| 0030046401-75 | | 117700.00 | Road/Street, Area /Locality | DHATRAK HIGHTS APT FLAT NO 5 |
| 0030063301-70 | | 19610.00 | Town/ City/ District | DASAK NASHIK NASHIK Maharashtra |
| | | 0.00 | PIN | 4 2 2 1 0 1 |
| | | 0.00 | Remarks (If Any) : | |
| | | 0.00 | | |
| | | 0.00 | | |
| | | 0.00 | | |
| | | 0.00 | | |
| | | 0.00 | | |
| Total | | 137310.00 | Amount in words | Rupees One Lakhs Thirty Seven Thousand Three Hundred Ten Only |
| Payment Details:IDBI NetBanking Payment ID : 99931037 | | | FOR USE IN RECEIVING BANK | |
| Cheque- DD Details: | | | Bank CIN No : 69103332016091450528 | |
| Cheque- DD No. | | | Date | 14-09-2016 |
| Name of Bank | IDBI BANK | | Bank-Branch | |
| Name of Branch | | | Scroll No. | |

नासक - २

दस्त क्र. ( ६४७८ )२०१६

२/३५

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2

Authorised Signatory



9/14/2016 12:55 PM

Sale

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२, यांची मुद्रा

| नसन - २ |
|---|
| दस्त क्र. (६५८५)२०१६ |
| ३ /३० |

विभाग क्र. 10.1 (दर 26,600/-)

शासकीय मुल्यांकन रुपये 19,61,000/- स्टॅम्प + एलबीटी रुपये 1,17,700/-

मोबदला किंमत रुपये 19,61,000/- नोंदणी फी रुपये 19,610/-

## करारनामा

करारनामा आज दिनांक 15 माहे सप्टेंबर इसवी सन 2016 रोज गुरुवार ते दिवशी नाशिकरोड मुक्कामी :-

नरसन

दस्त क्र. ( ६४७८ )२०१६

९ / ३५

- 2 -

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR CLASS-II

| | |
|---|---|
| 1) श्री. अनिल प्रल्हाद वेळे<br>उ. वय. 34 वर्षे, धंदा – नोकरी<br>PAN – AHFPV1097A<br>2) सौ. ज्योतीबाई अनिल वेळे<br>उ. वय. 27 वर्षे, धंदा – गृहिणी<br>UID – 970311644259<br>दोघे राहणार – भोरस बुद्रुक,<br>जळगाव – 424101 | लिहून घेणार |

– यांसी –

| | |
|---|---|
| 1) श्री. विजय अशोक धात्रक<br>उ. वय. 32 वर्षे, धंदा – व्यापार<br>PAN – AJVPD7208F<br>2) श्री. सुनिल अशोक धात्रक<br>उ. वय. 30 वर्षे, धंदा – व्यापार<br>PAN – AJZPD6408M<br>दोघे राहणार – धात्रक चाळ, रूम नं. 3,<br>व्यापारी बँकेमागे, जेलरोड, नाशिकरोड<br>यांचे विकसनकर्ता व जनरल मुखत्यार म्हणुन<br>एन.एस.के. डेव्हलपर्स<br>तर्फे प्रोप्रायटर<br>श्री. खिलेंद्रकुमार दिलीप मोहबिया<br>उ. वय. 30 वर्षे, धंदा – व्यापार<br>PAN – AQDPM9215C<br>राहणार – प्लॉट नंबर 9, साई दर्शन,<br>जनाई नगर, कॅनॉल रोड, दसक, जेलरोड,<br>नाशिकरोड | लिहुन देणार |

SEAL OF THE JOINT JOINTSUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2

नसन - २

... 3 दस्त क्रं. (६५६८)२०१६

५ /३०

कारणे करारनामा लिहून व मे. सह. दुय्यम निबंधक वर्ग–2 नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून देतात ऐसा जे की :–

(1) **मिळकतीचे वर्णन :–**

अ) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील, **मौजे दसक** या गांवचे शिवारातील **सर्व्हे क्रमांक 27ब/14** याचे मंजूर ले–आऊट प्लॅनपैकी **प्लॉट नंबर 35** यांसी **क्षेत्र 951.42 चौरस मीटर पैकी सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे <u>471.42 चौरस मीटर</u>** यांसी **सिसनं 2566पैकी** यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :–

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | प्लॉट नंबर 35 पैकी 180 चौरस मीटर क्षेत्र व त्यापलीकडे प्लॉट नंबर 36 |
| पश्चिमेस | : | प्लॉट नंबर 35 पैकी 300 चौरस मीटर क्षेत्र व त्यापलीकडे 30 फुट रूंदीचा रस्ता |
| दक्षिणेस | : | सर्व्हे नंबर 27/सी/1 |
| उत्तरेस | : | 20 फुट रूंदीचा रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत जल, तरू, काष्ट, पाषाण, निधीनिक्षेप, तदंगभुत वस्तुंसहीत दरोबस्त मिळकत.

**ब) सदर करारनामाचा विषय असलेल्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन:–**

वर कलम 1अ यांत वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या व **"धात्रक हाईटस् अपार्टमेंट बी–विंग"** म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील **दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक बी–5** यांसी **बांधीव क्षेत्र 793.00 चौरस फुट म्हणजेच 73.69 चौरस मीटर बिल्ट अप** यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :–

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | ए विंग |
| पश्चिमेस | : | फ्लॅट नंबर 8 |
| दक्षिणेस | : | फ्लॅट नंबर 6 |
| उत्तरेस | : | 6 मीटर रोड |

नसन - २

दस्त क्र. ( ६५५८ )२०१६

६ / ३६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK 2

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत त्यातील सामाईक सुखसुविधा, सामाईक जिना, सामाईक टेरेस, तसेच जाण्यायेण्याचे सामाईक वागवहिवाटीचे सर्व हक्कांसह दरोबस्त मिळकत.

प्रस्तुतचे दस्तामध्ये **लिहून घेणार** यांचा उल्लेख **'तुम्ही'** व **लिहून देणार** यांचा उल्लेख **'आम्ही'** असा केलेला असून **बांधीव मिळकतीचा** उल्लेख **'सदर मिळकत'** असा संक्षिप्ततेसाठी करण्यात आलेला आहे. या संज्ञामध्ये या प्रत्येकाचे वंशवारस, कुटुंबीय, प्रतिनिधी, असायनीज, अॅडमिनीस्ट्रेटर्स, लिगल रिप्रेझेंटेटीव्ह, सक्सेसर या सर्वांचा समावेश आहे.

(2) वर कलम 1अ यात वर्णन केलेली संपुर्ण प्लॉटची मिळकत ही श्री. विजय अशोक धात्रक व श्री. सुनिल अशोक धात्रक यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत श्री. विजय अशोक धात्रक व श्री. सुनिल अशोक धात्रक यांना श्रीमती. म्हाळसाबाई भिवा धात्रक यांनी दिनांक 7/1/2014 रोजी बक्षिस पत्राने दिलेली आहे. सदरचे बक्षिस पत्र मे. सह दुय्यम निबंधक वर्ग 2 नाशिक 2 यांचे कार्यालयात दस्त नोंदणी क्रमांक 359 दिनांक 9/1/2014 अन्वये नोंदवुन दिलेले आहे. तशी रेकॉर्ड ऑफ राईटसला 7/12 सदरी मालकी हक्कात श्री. विजय अशोक धात्रक व श्री. सुनिल अशोक धात्रक यांचे नावाची फेरफार नोंद क्रमांक 14183 अन्वये नोंद झालेली आहे. सदर मिळकतीची पाहिजे तशी विल्हेवाट लावण्याचा श्री. विजय अशोक धात्रक व श्री. सुनिल अशोक धात्रक यांना पुर्णपणे हक्क व अधिकार आहे.

(3) वर कलम 1अ यात वर्णन केलेल्या मिळकतीचा 7/12 उतारा व सिटी सर्व्हेचा उतारा हा संपुर्ण क्षेत्राचा आहे. सदर मिळकतीचे सिटी सर्व्हे रेकॉर्डप्रमाणे 1092.00 चौरस मीटर क्षेत्र व 7/12 प्रमाणे 951.42 चौरस मीटर क्षेत्र असे आहे. सदर एकुण क्षेत्रापैकी वर कलम 1अ मध्ये नमुद केलेले फक्त 471.42 चौरस मीटर क्षेत्र श्री. विजय अशोक धात्रक व श्री.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२

नसन - २
दस्त क्र. (६५७८)२०१६
७ / ३०

सुनिल अशोक धात्रक यांनी लिहून देणार / एन.एस.के. डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री. खिलेंद्रकुमार दिलीप मोहबिया यांना विकसन करण्यास दिलेले क्षेत्र आहे. उर्वरीत क्षेत्रापैकी पश्चिमेकडील 300 चौरस मीटर क्षेत्र हे श्री. विजय अशोक धात्रक व श्री. सुनिल अशोक धात्रक यांनी स्वतःकरीता ठेवलेले आहे. तसेच पुर्वेकडील 180 चौरस मीटर क्षेत्रावर मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे श्री. विजय अशोक धात्रक व श्री. सुनिल अशोक धात्रक हे मालक या नात्याने मंजुर प्लॅनप्रमाणे 3 फ्लॅटचे स्वतः बांधकाम करणार आहे.

येणेप्रमाणे श्री. विजय अशोक धात्रक व श्री. सुनिल अशोक धात्रक यांनी वर कलम 1अ यात वर्णन केलेली मिळकत विकसीत करण्याचे ठरवुन एन.एस.के. डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री. खिलेंद्रकुमार दिलीप मोहबिया यांचे लाभात दिनांक 24/8/2016 रोजी विकसन करारनामा व जनरल मुखत्यार पत्र लिहून दिलेले आहे. सदरचा विकसन करारनामा व जनरल मुखत्यार पत्र मे. सह दुय्यम निबंधक वर्ग 2 नाशिक 2 यांचे कार्यालयात दस्त नोंदणी क्रमांक 5993 व 5994 दिनांक 24/8/2016 अन्वये नोंदविलेला आहे. त्या हक्क व अधिकारात एन.एस.के. डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री. खिलेंद्रकुमार दिलीप मोहबिया हे सदर मिळकत विकसीत करत आहे.

(4) वर कलम 1अ यात नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा ले–आऊट मे. सहाय्यक संचालक नगररचना विभाग, जळगांव यांचेकडील पत्र क्रमांक **डी.व्ही./एन.एस.के./1357 दिनांक 19/6/1973** अन्वये झालेला आहे.

(5) वर कलम 1अ यात नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा बिनशेती वापर करण्याकरीता मे. जिल्हाधिकारी सो., नाशिक यांनी त्यांचेकडील हुकूम नं. एलएनडी/II/1066/73 दिनांक 26/7/1973 नुसार परवानगी दिलेली आहे.

नसन - २

दस्त क्र. ( ६५७८ )२०१६

८ / ३५

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II



(6) वर कलम 1अ यांत वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या इमारतीला **धात्रक हाईटस् अपार्टमेंट** असे नाव देण्यात येणार असुन सदर इमारतीचा बिल्डींग प्लॅन हा नाशिक महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक **एलएनडी / बीपी / सी4 / 14 / 369 दिनांक 18 / 5 / 2016** अन्वये मंजूर केलेला आहे.

(7) वर कलम 1ब यांत वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही **"धात्रक हाईटस् अपार्टमेंट"** मधील असुन सदरील अपार्टमेंट ही **महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट, 1970 अन्वये मे. सह दुय्यम निबंधक वर्ग 2** नाशिक यांचेकडे नोंदणीकृत करावयाची आहे.

(8) वर कलम 1अ यांत वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडील मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे 16 रहिवासी फ्लॅटचे बांधकाम करावयाचे आहे. त्याकामी आम्ही आर्किटेक्ट श्री. विजय के. सानप व स्ट्रक्चरल इंजिनियर श्री. विजय के. सानप यांची नेमणुक केलेली आहे.

(9) वर कलम 1अ व ब यांत वर्णन केलेली मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची असुन मिळकत कोठेही गहाण, दान, बक्षीस, लिन, लिज, अन्नवस्त्र, साठेखत, करारनामा, तबदील, तारण, कोर्ट हुकूमनामा, कोर्ट जप्ती, कोर्ट दावा, हुकूमनामा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, जामिनकी अथवा कोणत्याही प्रकारच्या जडजोखमीत गुंतविलेली नाही. यदाकदाचित सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा आढळुन आल्यास त्याचे निवारण लिहून देणार हे पदरखर्चाने दूर करून देतील त्याची तोषिस लिहून घेणार यांस लागू देणार नाही.

(10). **फ्लॅटची किंमत :–** लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान सदर फ्लॅट मिळकतीची एकूण **किंमत रूपये 19,61,000 / –** (अक्षरी **रक्कम रूपये एकोणावीस लाख एकसष्ठ हजार मात्र)** इतकी ठरलेली आहे. सदरची किंमत आजचे बाजारभावाप्रमाणे योग्य व बरोबर

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२ यांचा शिक्का



असुन किंमतीविषयी तक्रार राहिलेली नाही. सदरची एकुण किंमतीपैकी **रक्कम रूपये 2,00,000/— (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख मात्र)** ही तुमचेकडुन आम्हाला खालीलप्रमाणे मिळाली.

**तपशिल**

| **रक्कम रूपये** | |
|---|---|
| 1,00,000/— | अक्षरी रक्कम रूपये एक लाख मात्र चेक नंबर 303716 दिनांक 20/4/2016 स्टेट बँक ऑफ पटीयाला अन्वये मिळाले. |
| 1,00,000/— | अक्षरी रक्कम रूपये एक लाख मात्र चेक नंबर 303717 दिनांक 7/6/2016 स्टेट बँक ऑफ पटीयाला अन्वये मिळाले. |
| 2,00,000/— | अक्षरी रक्कम रूपये दोन लाख मात्र |

तसेच **उर्वरीत राहिलेली रक्कम रूपये 17,61,000/— (अक्षरी रक्कम रूपये सतरा लाख एकसष्ठ हजार मात्र)** आजपासुन **06 महिने** मुदतीत आम्ही मागणी करू त्याप्रमाणे अदा करावयाची आहे. ही या कराराची महत्वाची अट व शर्त आहे व ती तुम्हांस मान्य व कबुल आहे.

(11) यदाकदाचित तुम्ही सदर फ्लॅटची बुकींग रद्द केल्यास फ्लॅटचे एकुण किंमतीचे 10% रक्कम वजा करून राहिलेली रक्कम तुम्हांस परत केली जाईल व त्यानंतर सदर फ्लॅटशी तुमचा काहीही संबंध राहणार नाही.

(12) तुम्हांस जी मिळकत द्यावयाची आहे. तिचे बांधकाम व त्यामधील सुखसोयी या खालील परिशिष्ट मध्ये नमुद केलेल्या आहेत. त्या तुम्हांस मान्य व कबुल आहे. तसेच कारपेट क्षेत्रात 35% अधिक धरून बिल्ट अप

नसन - २
दस्त क्र. ( ६५७८ )२०१६
९० / ३०
SEAL OF THE JOINT JOINTSUB-REGISTRAR CLASS II
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२, सही शिक्का
NASHIK 2



क्षेत्र मोजले जाईल. कारपेट क्षेत्र मोजतांना विटकाम ते विटकाम असे मोजण्यात येईल.

(13) वर नमुद केल्याप्रमाणे उर्वरीत रक्कम तुम्ही आम्हांस अदा करावयाची आहे. परंतु सदरची रक्कम भरण्यास विलंब झाल्यास थकलेल्या रक्कमेवर 24% व्याज तुम्हांस द्यावे लागेल हे तुम्हांस मान्य व कबुल आहे.

(14) वर वर्णन केल्याप्रमाणे तुम्ही आम्हांस सदरची रक्कम अदा केली नाही तर सदरचा करारनामा रद्द करण्याचा हक्क व अधिकार आम्हांस आहे व राहील हे तुम्हांस मान्य व कबुल आहे.

(15) आम्ही तुम्हांस फ्लॅटचा ताबा संपूर्ण रक्कम मिळाल्यानंतर बांधकाम पुर्ण झाल्यावर देवू. परंतु सदर मिळकतीचे खरेदीखत हे नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडुन बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर व अपार्टमेंट डिक्लरेशन नोंदणीकृत केल्यानंतर करून देवु हे तुम्हांस मान्य व कबुल आहे.

(16) तुम्हांस तुमच्या फ्लॅटचे कॉमन खर्चाचे सरकारी कर, टॅक्सेस, म्युनिसिपल कर (घरपट्टी, पाणीपट्टी), इलेक्ट्रीक बिल, मेन्टेनन्स चार्जेस इ. हे तुमचे तुम्ही भरावयाचे आहे. तसेच सदर मिळकतीचा सामाईक बिनशेती सारा, सर्व्हिस टॅक्स, वॅट इ. हे तुम्ही तुमचे हिस्सेराशीने भरावयाचे आहेत.

(17) वर कलम 1ब या मिळकतीमध्ये विजेचे स्वतंत्र व पाण्याचे सामाईक कनेक्शन दिले जाईल व स्वतंत्र वीज मीटर बसविण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. व नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडील वेळोवेळी होणारे बदल व नियम हे तुमचेवर बंधनकारक आहे व राहतील.

नसन - २

दस्त क्र. ( ६५५८ )२०१६

9

११/३०

(18) तुम्हांस जो फ्लॅट घावयाचा आहे, त्यांचे बांधकाम व त्यामधील सुख–सुविधांची तुम्हांस संपुर्ण माहिती दिलेली आहे. त्याबाबत तुमची कोणत्याही प्रकारची तक्रार राहिलेली नाही.

(19) वर कलम 1ब यांत वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेवू शकता, सदरचे कर्ज मिळविण्यासाठी आमचेकडुन आवश्यकता असलेले कागदपत्र आम्ही तुम्हांस देवू, परंतु सदरचे कर्ज मंजूर करण्याची व कर्जाची संपूर्णपणे परतफेड करण्याची जबाबदारी तुमची आहे व राहील. सदरचे कर्जाची रक्कम वेळेवर न मिळाल्यास किंवा उशिर झाल्यास तुम्हांला रोख पैसे भरावे लागतील ही संपूर्ण जबाबदारी तुमचीच आहे व राहील.

(20) तुम्ही किंवा तुमचे कुटुंबातील व्यक्तींनी सदर फ्लॅट मधुन कुठल्याही प्रकारची घाण, कचरा, उष्टे, खरकटे आपल्या इमारतीच्या अगर आपल्या शेजारील फ्लॅटच्या आजुबाजुला अगर इमारतीच्या आवारात अगर मोकळया परिसरात कुठेही टाकू नये. सदरहु कचऱ्याची विल्हेवाट ही नाशिक महानगरपालिकेच्या घंटागाडीतूनच लावावी अथवा कचरा कुंडीतच टाकावा.

(21) सदरहु फ्लॅट हा तुम्हांस फक्त रहिवासी कारणासाठीच विक्री करावयाचा असुन सदरहु फ्लॅटमध्ये कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर वर्तन तुम्हांस करता येणार नाही अगर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करता येणार नाही. तसेच इतर फ्लॅट धारकांना काही त्रास होईल असे कोणतेही कृत्य अगर वर्तन तुम्ही करावयाचे नाही.

(22) वर कलम 1ब यांत वर्णन केलेली मिळकत तुमचे ताब्यात दिल्यानंतर तुम्ही इमारतीचे मुळ बांधकामास कोणताही धोका पोहोचेल असे बांधकाम/दुरुस्ती करावयाची नाही, केल्यास त्यामुळे होणाऱ्या नुकसानाच्या संपूर्ण खर्चाची व परिणामांची जबाबदारी तुमचीच राहील.

| |
|---|
| नसन – २ |
| दस्त क्र. ( ६११८ )२०१६ |
| १२ / ३१ |

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK 2

(23) वर कलम 1ब यांत वर्णन केलेली फ्लॅट मिळकतीचे खरेदीकामी लागणारा खर्च म्हणजेच स्टॅम्प, नोंदणी फी, टायपिंग, झेरॉक्स, वकील फी व इतर खर्च हा लिहून घेणार यांनी करावयाचा आहे.

(24) सदर प्लॉट हा **दसक** शिवार ता. जि. नाशिक या परिसरात येत असल्याने तेथील जे वातावरण आहे ते तीनही ऋतुला पोषक असे आहे. म्हणजेच हिवाळयात वातावरण खुप थंड होणे, उन्हाळयात कडाक्याचे उन पडणे, अथवा पावसाळयात पर्जन्यवृष्टी, गारवा अथवा अति उकडणे या सर्व वातावरणाचा परिणाम नवीन बांधकामावर होत असतो, त्यामुळे फ्लॅट मध्ये आतील व बाहेरील प्लास्टरला बारीक तडे, एअर क्रॅक्स जाण्याचा संभव असतो याची स्पष्ट कल्पनादेखील आम्ही तुम्हांस दिलेली आहे.

(25) सदरचा करारनामा हा महाराष्ट्र ओनरशिप ॲक्ट (रेग्युलेशन ॲन्ड प्रमोशन ऑफ कंन्स्ट्रक्शन, सेल, मॅनेजमेंट ॲण्ड ट्रान्सफर) कायदा 1973 च्या तरतुदीस अधिन राहून केला आहे. तसेच डिक्लरेशन ऑफ अपार्टमेंटमध्ये नमुद केलेले नियम व नियमावली लिहून घेणार यांना मान्य व कबुल असून त्यांचेवर बंधनकारक राहतील.

**—: परिशिष्ट :—**

**तुम्हांस दिलेल्या सुखसुविधा**

1. आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर.
2. बांधकाम – बाहेरील भिंती – 6 इंची व आतील भिंती 4 इंच विट बांधकाम.
3. बाहेरून सॅन्ड फेस व आतुन नेरू प्लास्टर.
4. संपूर्ण 2'' X 2'' डायमंड टाईल्स फ्लोअरिंग असतील.
5. बाथरूम मध्ये 7 फुट उंचीपर्यंत ग्लेझ्ड टाईल्स व डब्ल्यु.सी.मध्ये 4 फुट व्हाईट ग्लेझ्ड टाईल्स असतील.
6. किचन प्लॅटफॉर्म ग्रेनाईट मध्ये असेल.
7. सर्व दरवाजे वॉटर प्रुफ फ्लश डोअर्स असतील व मेन डोअरला लॅमिनेटेड शिट असेल.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2

| नसन - २ |
| --- |
| दस्त क्र. ( ६५७८ )२०१६ |
| १३/३५ |

8. सर्व खिडक्या हया ॲल्युमिनिअम स्लायडींग तीन ट्रॅकमध्ये असतील.
9. पी.व्ही.सी. कन्सील्ड प्लंबींग फिटींग करण्यात येईल.
10. किचन, डब्ल्यु.सी. व वॉश बेसिन मध्ये प्रत्येकी एक – एक नळ तसेच बाथरूममध्ये थंड व गरम पाण्याचे मिक्सर लावण्यात येईल.
11. सर्वत्र कन्सिल्ड इलेक्ट्रीकल फिटींग असेल.
12. सदर मिळकतीचे संपुर्ण इमारतीस वॉल कंपाउंड करून योग्य ठिकाणी गेट बसवुन देण्यात येईल.

**टिप** :– याव्यतिरिक्त जादा सुख–सुविधा पाहिजे असल्यास त्याचे चार्जेस वेगळे ॲडव्हान्समध्ये द्यावे लागतील. स्टॅम्प व रजिस्ट्रेशन फी मोबदल्याव्यतिरिक्त वेगळे राहील. तसेच एमएसईबी चे लाईट मीटर कनेक्शनकरीता व त्या अनुषंगाने येणारा इतर सर्व खर्च लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना स्वतंत्रपणे द्यावयाचा आहे.

येणेप्रमाणे सदरचा करारनामा राजीखुशीने, स्वसंतोषाने, कुणाचेही धाक दडपणांस बळी न पडता, नशापाणी न करता, समजुन, उमजुन, वाचुन घेऊन, दोन साक्षीदारांचे समक्ष लिहून व नोंदवून दिला असे.

हा करारनामा,





1) श्री. विजय अशोक धात्रक
2) श्री. सुनिल अशोक धात्रक
यांचे विकसनकर्ता व जनरल मुखत्यार म्हणुन
एन.एस.के. डेव्हलपर्स
तर्फे प्रोप्रायटर
श्री. खिलेंद्रकुमार दिलीप मोहबिया
लिहून देणार

| नसन - २ |
|---|
| दस्त क्र. ( ५४०८ )२०१६ ... 12 ... |
| ९४ / ३८ |

SEAL OF THE JOINT JOINTSUB-REGISTRAR CLASS-II · NASHIK-2 ·
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२



1) श्री. अनिल प्रल्हाद वेळे



2) सौ. ज्योतीबाई अनिल वेळे
लिहून घेणार

साक्षीदार :-

(1)

(2)